मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या अंमलबजावणीसाठी ग्रामविकास व जलसंधारण विभागांतर्गत सचिव (अभियंता संवर्गातील) एक पद निर्माण करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः : ग्रासयो २०१५/प्र.क्र.९ /पंरा -७
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई ४०० ००१
तारीख: २७ जानेवारी, २०१६

वाचा : १) शासन निर्णय क्र,ग्रासयो-२०१५/प्र.क्र.१२/योजना-९ दि.२८.१०.२०१५

२) वित्त विभागाचे क्र. पदनि-२०१५/प्र.क्र.६९/१५/विसु-१ दि.१२.१.२०१६ सोबतचे इतिवृत्त

प्रस्तावना :

राज्यातील न जोडलेल्या वाड्या-वस्त्या जोडण्यासाठी नवीन जोडणी व प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत अंतभूर्त न झालेल्या अस्तित्वातील दुरावस्था झालेल्या रस्त्यांची दर्जोन्नती करणेसाठी प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या धर्तीवर राज्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजना सुरु करण्याचा धोरणात्मक शासन निर्णय दि. २८.१०.२०१५ अन्वये निर्गमित करण्यात आला आहे. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागांतील अभियंता संवर्गातील सचिवांच्या वेतनश्रेणीतील एक पद निर्माण करण्यास मा. मंत्रीमंडळाने दि. १४.१०.२०१५ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता प्रदान केली आहे. तसेच उच्चस्तरीय सचिव समितीने दि.४.१.२०१६ च्या बैठकीत सदर पद निर्मितीस मान्यता दिली आहे. त्या अनुषंगाने सदर पद निर्मितीचे आदेश निर्गमित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या अंमलबजावणीसाठी ग्रामविकास व जलसंधारण विभागांतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागातील अभियंता संवर्गातील सचिवांच्या वेतनश्रेणीतील एक पद निर्माण करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. सदर पदाची वेतनश्रेणी खालीलप्रमाणे राहील.

अ.क्र.	पदाचे नांव	कार्यालय	वेतनश्रेणी	पदांची संख्या
१	सचिव (अभियंता संवर्गातील)	ग्राम विकास व जलसंधारण विभाग	रू.३७,४०० ते रू.६७,००० ग्रेड-पे-रु. १०,०००	१

२. सचिव (अभियंता संवर्गातील) या पदास येणारा खर्च मागणी क्र.एल-७, ५०५४, मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च, ०४, जिल्हा व इतर ग्रामीण मार्ग , ३३७, रस्त्यांची बांधकामे (००) (०१) मुख्यमंत्री ग्रामीण मार्ग योजना, नवीन रस्ते बांधणे व अस्तिवातील रस्त्यांचे नुतनीकरण, ५३ मोठी बांधकामे (५०५४ ५१५३) या लेखाशिर्षाखाली त्या-त्या वर्षी मंजूर करण्यात आलेल्या उपलब्ध तरतूदीतून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांचा अनौपचारिक संदर्भ क्र. ४०/२०१६/सेवा-९ दि. २५.०१.२०१६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक

२०१६०१२७१०४२१८४६२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Raghunath A Nagargoje

Digitally signed by Raghunath A Nagargoje
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Raghunath A Nagargoje
Date: 2016.01.27 15:18:49 +05'30'

(र.आ.नागरगोजे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल,यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री याचे प्रधान सचिव
३. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता)/ महालेखापाल(लेखापरिक्षा),महाराष्ट्र,मुंबई/नागपूर
४. विभागीय आयुक्त (सर्व विभाग)
५. मुख्य अभियंता,प्रधानमंत्री/मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था कॅम्प ऑफीस पुणे.
६. सह सचिव/उप सचिव ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग
७. सर्व जिल्हाधिकारी
८. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद (सर्व)
९. सर्व अधीक्षक अभियंता, प्रधानमंत्री/मुख्यमंत्री ग्रा.स. यो., म. ग्रा. र. वि. संस्था
१०.सर्व कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री/ मुख्यमंत्री ग्रा.स. यो., म. ग्रा. र. वि. संस्था
११.अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई
१२.निवासी लेखापरिक्षा अधिकारी,मुंबई
१३.मा.मंत्री (ग्रामविकास व जलसंधारण) यांचे खाजगी सचिव,
१४.मा.राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव
१५.मा. प्रधान सचिव (ग्राम विकास व पंचायती राज) यांचे स्वीय सहायक,मंत्रालय,मुंबई
१६.माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, प्रधानमंत्री/ मुख्यमंत्री ग्रा.स. यो., म. ग्रा. र. वि. संस्था कॅम्प ऑफीस पुणे
१७.सामान्य प्रशासन विभाग/वित्त विभाग/सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय,मुंबई
१८. सर्व कार्यासने ग्राम विकास व जलसंधारण विभाग,(रोखशाखेसह)
१९.निवडनस्ती पंरा-७ ग्रा वि व ज सं वि